# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

संदर्भ- परिपत्रक क्र. कोविमं/शाखा-उमा/खा.वि/१२२६ दिनांक- ०९/१०/२०२१

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी ) व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र ( इ.१०वी ) सन २०२२ च्या परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्याच्या ऑनलाईन (ONLINE) नावनोंदणी अर्जास नियमित शुल्काने मुदतवाढ देण्याबाबत..**

संदर्भ- या कार्यालयाचे पत्र क्र. कोविमं/शाखा-उमा/खा.वि/ १११४, दिनांक- १३/०९/२०२१

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त संपर्क केंद्र व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की , महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सन २०२२ च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस खाजगीरित्या (फॉर्म नं.१७) प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यासाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे नियमित शुल्काने भरण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यासाठी खाली नमूद केलेल्या सूचनानुसार कार्यवाही करावयाची आहे.

१. इयता १२ वी व इ. १० वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या मुदतवाढीबाबतच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशिल |
|---|---|---|
| १ | **बुधवार दिनांक १३/१०/२०२१ ते बुधवार दिनांक २७/१०/२०२१** | विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे. |
| २ | **गुरूवार दिनांक १४/१०/२०२१ ते गुरूवार दिनांक २८/१०/२०२१** | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत /कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. |
| ३ | **मंगळवार दिनांक ०२/११/२०२१** | संपर्क केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

२. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात यावा. कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे इ.१०वी, इ.१२वी सन २०२१ चा निकाल जुलै-ऑगष्ट मध्ये लागलेला असल्याने, खाजगी विद्यार्थी ऑनलाईन नाव नोंदणीबाबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या दाखल्यावरील शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याची तारीख **३१/०८/२०२१** अशी ग्राहय धरण्यात यावी. सदर बदल कोविड-१९ मुळे फक्त २०२२ च्या परीक्षेपुरताच लागू राहील. तथापी विद्यार्थ्यांच्या वयासाठी दिनांक ३१ जुलै अशी तारीख राहील.

**३.** खाजगी विद्यार्थ्यांने इ.१० वी व इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज हे ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचा ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

४..विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मंडळाच्या खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजीमधून उपलब्ध आहेत. त्यावाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

(इ. १० वी) **http.//form17.mh-ssc.ac.in**

(इ. १२ वी) **http.//form17.mh- hsc.ac.in**

**५.** विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीयप्रत २) मुळ गुणपत्रक व प्रमाणपत्र ३) आधारकार्ड ४) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

**६.** कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य **(Compulsory)** आहे.

**७.** संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआउट, ऑनलाईन शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

**८.** विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोच पावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

**९.** खाजगी विद्यार्थ्यासाठी नाव नोंदणी शुल्काचा तपशिल खालील प्रमाणे-

इ.१० वी **रूपये १०००**/- नोंदणी शुल्क + रूपये **१००**/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)

इ.१२ वी **रूपये ५००**/- नोंदणी शुल्क + रूपये **१००**/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)

**१०. .अ)** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्यांने करावयाची आहे. या संपर्क केंद्राने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगीक मुल्यमापन करावयाचे आहे.

**ब)** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांने करावयाची आहे. त्या कनिष्ठ महाविद्यालयाद्वारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी,श्रेणी परीक्षा दयावयाची आहे. कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांनी करावयाची आहे. त्या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळ मार्गदर्शन करतील.

**११. इ. १० वी व इ.१२ वी सन २०२२- खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने ( Debit Card/Credit Card/UPI/Net Banking ) द्वारे भरणे अनिवार्य राहिल. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वत:जवळ ठेवून त्याच्या**

**दोन छायाप्रती संपर्क केंद्राला व कनिष्ठ महाविद्यालयात देण्यात याव्यात. तसेच एकदा नाव नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नाव नोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी अर्जात दुरूस्ती करावयाची ( उदा. माध्यम, शाखा, संपर्क केंद्र अथवा अन्य कारणास्तव ) असल्यास विद्यार्थ्यास पुन:श्च नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन जमा करावे लागेल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

१२. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/ प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ / कनिष्ठ महाविद्यालय / संपर्क केंद्र यांचे कडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

१३. ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दुरध्वनी **क्र.०२०-२५७०५२०७/२५७०५२०८/२५७०५२७१** वर संपर्क साधावा.

१४. विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मुळ कागदपत्रे संपर्क केंद्र/ कनिष्ठ महाविद्यालयाकडून निर्धारित कालावधी नंतर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१५. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करून द्यावी.

(श्री. देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर,
१) सर्व मान्यता प्राप्त संपर्क केंद्र व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर.
२) मा.सचिव,महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
भांबुर्डा,शिवाजी नगर,पुणे.